230
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
नं. १६
काव्य

गवतान्तर्गत

# ऋश्यशृंगोपचरित.

ही ल्हानशी कविता.



230 म. ग्रं. सं. ठाणें १
विषय काव्य
लेखक रा. वि. गोडबोले
2 ८
सन १८
ालय क्रमांक १६
पुस्तकाचें नांव ऋश्यशृंगोपचरित
श्रीमन्महाभारतान्तर्गत

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

काव्य
०२५

॥ श्री ॥

श्रीमन्महाभारतान्तर्गत

# ऋष्यशृंगोपचरितप्रारंभः

( साकीवृत्त )

श्रीमद्गजमुख मंगलदायक, वंदूं ब्रह्मकुमारी ॥
सुरगुरु भास्कर मधुकैटभहा[1] हिमनगजा[2] कामारि[3] ॥१॥
पंचायतना नमुनि महर्षी वाल्मीकि व्यासादि ॥
वसिष्ठगुरु तो श्रीरामाचा, तापस ते अत्र्यादि ॥ २ ॥
मुनींद्र योगी संत महंताहि वंदुनियां लवलाहें ॥
ज्यांच्या स्मरणें पातकनाशन होऊनि सुकृत[4] लाहे ॥३॥
श्रोते आतां सावधान[5] व्हा ऐका सुरस कथेला ॥
क्षणभरि होई सुखद मनोहर ऐशा ह्या गाथेला ॥४॥
साधेभोळे जे नर केवळ धर्म-मार्ग-अनुरक्त ॥
सहजवश्य ते कसे वंचकां[6] येथ करूं हें व्यक्त[7] ॥ ५ ॥
दुश्चरिता त्या स्त्रियाहि कैशा लुटिति तपोधन त्यांचें ॥
समजावें कीं जनां असें हें येथ कथानक साचें ॥६॥
चंडक्रोधी[8] मुनी विभांडक, तत्सुत[9] शृंगऋषीला ॥
अंगपतीचा वेश्या गण वश सहजचि करितां झाला ॥७॥

---

१ मधु आणि कैटभ ह्यांचा नाशकर्ता विष्णु. २ पार्वती. ३ महादेव. ४ पुण्य. ५ लक्ष्य द्या. ६ ठकास. ७ स्पष्ट. ८ अत्यंत कोपिष्ट. ९ त्याचा मुलगा

श्रीमद्वेदव्यास मुनीचा महा भारत ग्रंथ ॥
भरतभूमिचा इतिहास भला, सद्गतिचा जो पंथ ॥ ८ ॥
कथा भाग हा आहे त्याच्या तिसऱ्या त्या वनपर्वी ॥
लोमशमुनिसह पांडव यात्रा करीत फिरती ऊर्वी[१] ॥९॥
हेमकूट गिरिसन्निध येतां नंदा अपरानंदा ॥
पुण्यनद्यांच्या स्नानेंपानें पांडव पावति मोदा[२] ॥ १० ॥
ऋषभगिरीच्या शिलावृष्टितें पाहुनि शंकित झाले ॥
लोमशमुनिनें पूर्ववृत्त तें युधिष्ठिरा कथियेलें ॥ ११ ॥
राजर्षी जो गाधिज त्याचा दिव्याश्रम पाहोनी ॥
नदी कौशिकी सन्निध वाहे तिजमध्यें नाहोनी ॥१२॥
काश्यपवंशीं ऋषीविभांडक, त्याचा सुत मुनिशृंग ॥
परमतापसी, त्यांचा आश्रम पाहूं जाति सवेग ॥१३॥
तेथें जातां लोमश बोले, "येथ विभांडक होता ॥
परमक्रोधी, ऋश्यशृंग ही लोमपादजामाता[३] ॥ १४ ॥
मृगीपासुनी जन्म जयाचें परि जो उग्र तपस्वी ॥
ज्याच्या भेणें इंद्र वर्षला तेणें होय यशस्वी ॥ १५ ॥
प्रजा पावती आनंदातें देशीं सुभिक्ष्य[४] होतां ॥
राजर्षी तो लोमपाद ज्या निजकन्या दे शांता" ॥ १६ ॥
लोमशमुनिचें वाक्य ऐकुनी विस्मय मनिं बहु पावे ॥
धर्मराज त्या विनवी, "ब्रह्मन्[५], वृत्तसमग्र कथावें ॥ १७
ऋश्यशृंग हा मृगीपासुनी कैसा केव्हां झाला ? ॥
शांता तेणें कैशी वरिली? इंद्र तयाकां[६] भ्याला ? ॥ १८ ॥

---

१ पृथ्वीवर. २ संतोषामत. ३ लोमपाद राजाच्या जांवई. ४ स्वस्ताई सुकाळ. ५ हे ब्राम्हणा. ब्राम्हण श्रेष्ठा. ६ का म्हणून.

लोमपाद तो अमुनि महात्मा आवर्षण कां पडलें ? ॥
सांगा स्वामिन् वृत्त सकल हें, अघटित कीं जें घडलें" १९
युधिष्ठिराचे प्रश्न ऐकुनी लोमशमुनि मग वदला ॥
तेचि कथा हे ऐका आतां देउनि अवधानाला ॥२०॥

---

बाल्यापासुनि मुनी विभांडक वनवासी एकाकी ॥
अमोघवीर्य[1] तेज तयाचें प्रजापतीसम लोकीं ॥ २१ ॥
महान्हदाच्या[2] संन्निध राहे, साधी उग्रतपासी ॥
कोणे एकेकाळीं गेला मध्यान्हस्नानासी ॥ २२ ॥
यदृच्छेनें[3] तेथें आल्या उर्वश्यादिक रंभा ॥
युवतीदर्शन[4] होई त्याच्या विघ्नचि पुण्यकदंबा[5] ॥२३॥
अप्सरोर्वशीदर्शनमात्रें[6] वीर्य तयाचें द्रवलें ॥
उदकामध्यें मिश्रित झालें हरिणी प्राशी वहिलें ॥२४
पूर्वी कोणी देवकन्यका ब्रह्मदेववचनानें ॥
हरिणी होउनि वनीं संचरे, तृषिता रवितापानें ॥२५॥
सरित्तटाकीं[7] जलपानातें प्राप्त जाहली सुगर[8] ॥
उदक प्राशी, होय गर्भिणी, विधिबळ कैसें थोर ॥२६
शृंग मस्तकीं असा जाहला सुत संगावांचून ॥
ऋश्यक्षेत्रीं जन्म ह्मणुन त्या ऋश्यशृंग अभिधान ॥२७॥
"ऋश्य" नाम हें मृगासि आहे. शृंगऋषीतें प्रसवे ॥
ऋश्या[9] मग ती देह टाकुनी देवगतीतें पावे ॥ २८ ॥

---

१ उर्ध्वरेता ब्रह्मचारी असल्यामुळें. २ मोठ्या डोहाच्या. ३ सहज गतीनें. ४ स्त्रियांचें दर्शन. ५ पुण्याच्या राशीस. ६ उर्वशी नामक आप्सरेला पाहून. ७ नदीतिरीं. ८ सुंदर अशी ती हरिणी. ९ हरिणी.

ऋषी विभांडक पुत्रस्नेहें ऋश्यशृंगसुतपाळी ॥
तोहि तिथें तप-अध्ययनादिक आचरत यथाकाळीं ।२९
जनकावांचुनि कोणी त्यातें दुसरें ठावें नाहीं ॥
गुरुशुश्रूषण[1] अग्न्यर्चन[2] तें सांग जयाचें पाहीं ॥३०॥
मूळफळांनीं तुष्ट सदा तो सुख पावे वनवासें ॥
स्त्री स्वप्नींही ठावी न तया, ब्रह्मचर्य अनयासें ॥३१॥
दारिद्र्याचें परमांजन तें भक्तीला बहुसाह्य ॥
ग्राम्यविषय हे त्याज्य वाटती जे करिती मनबाह्य[3]॥३२
पावुनि साधनसंपत्तीतें सहजासिद्ध या ऐशा ॥
पितापुत्र ते काळ क्रमिती चिंतुनियां परमेशा ॥३३॥

---

ऋश्यशृंग तो वयांत येउनि काळ लोटतां कांहीं ॥
अंगदेशपति लोमपादनृप, दशरथ ज्यास सखाही॥३४
तेणें विप्रा "देइन" ऐसें पूर्वी देउनि वचन ॥
वंचकबुद्धी[4] धरुनी मग तो वचना नकरी पूर्ण ॥ ३५ ॥
राजपुरोहित[5] तोही नगणी विप्राच्या अवमाना[6] ॥
तेणें दोषें इंद्र कोपला, उपजवि पीडा नाना ॥ ३६ ॥
नृपदोषातें प्रजा भोगिती, अत्यावर्षण[7] झालें ॥
अंगदेश तो त्रस्त[8] जाहला, लोमपाद मग बोले ॥३७॥
श्रेष्ठ विप्रहो, सांगा मजला ऐसा उपाय कांहीं ॥
जेणें वृष्टी होउनि सौख्या पावे मम प्रजाही ॥ ३८ ॥

---

१ गुरूची ह्मणजे पित्याची सेवा. २ अग्नीसेवा. ३ बहिर्मुख. ४ फसविण्याची बुद्धि. ५ राजाचा उपाध्याय. ६ अपमानास. ७ घोर अनावृष्टि. ८ पीडित अथवा भयाभीत.

आ. का. १९८



पर्जन्याधिप इंद्र मजवरी कैसा करी प्रसाद" ॥
एक ऋषी त्या बोले, "राजन्, घडला तुज प्रमाद[1]।३९।
वंचक होउनि विप्रातिक्रम[2] त्वां केला जो पाहीं ॥
करी निष्कृती[3] त्याची सत्वर, होइल सुखी प्रजाही॥४०॥
एका विप्रा अवमानीतां सर्व ब्राह्मण रुष्ट ॥
झाले तुजवरि, आतां आधीं शक्रा[4] करि संतुष्ट ॥४१॥
विभांडकाचा सुत तेजस्वी ऋश्यशृंग या नांवें ॥
येथें येउनि पूत करी हा देश अघें[5]चि करावें ॥४२॥
तरि तत्कालचि मेघ वर्षती, इंद्रहि सांडी कोपा ॥
माझ्या वचनीं संशय नधरीजरि इच्छिशि अघलोपा"४३
विप्रवाक्य हें ऐकुनि राजा सत्वर तेथूनि गेला ॥
प्रायश्चित्ता आचरूनिया परतुनि नगरा आला ॥४४॥
त्यातें पाहुनि पौरजनांच्या[6] हर्ष वाटला चित्तीं ॥
सर्वसचिव जन सभेंत मिळती, मग ते मंत्रा[7] करिती॥४५
"शृंगऋषीतें आणायास्तव करणें काय उपाया ?" ॥
ऐसें सर्वां प्रार्थितसे, परि उत्तर न मिळे राया ॥४६॥
परमक्रोधी मुनी विभांडक, ऐकुनि सर्वां ठावा ॥
तक्षक माथा रत्न हराया कोणें कर ठेवावा ? ॥४७॥
स्वल्पहि आगें[8] क्रुद्ध होउनी दग्ध करी शापून ॥
विभांडकातें भीत होउनी सर्वहि धरिती मौन ॥४८॥

---

लोमपाद मग वेश्यागण तो पाचारुनियां आणी ॥

---

१ अपराध, चूक. २ ब्राम्हणाचा अपमान. ३ प्रायश्चित्त. ४ इंद्रास. ५ पातकाचा नाश. ६ नागरिक जनांच्या. ७ मसलत. ८ थोडयाशा अपराधानेंही.

परवंचनपटु, दक्ष, धूर्त, जो कपटशताची खाणी ॥ ४९ ॥
विश्वामित्रासम योगी बहु युवतींनी नागविले ॥
जाणुनियां नृप त्या वेश्यातें वाखाणुनियां बोले ॥ ५० ॥
"तुम्ही जाउनि शृंगऋषीतें प्रेमें लुब्ध करावें ॥
विश्वासावें, यत्न करोनी येथवरी आणावें" ॥ ५१ ॥
राजाज्ञा ती परिसति वेश्या, पावति उत्कट ताप ॥
मानिति आज्ञाभंग भयप्रद, तेंवि विभांडकशाप ॥ ५२ ॥
भयभीता त्या दीन होउनी सद्गद बोलति वाक्य ॥
अबला आम्ही, क्षमस्व राजन्, आम्हां कार्य अशक्य ५३
त्यांच्यामध्यें अतिवृद्धा जी होती ती मग बोले ॥
"पाहूं करुनि प्रयत्न भूपा, साह्य करीं मज पहिलें" ५४
वृद्धेचा तो भाव जाणुनी रत्नें वस्त्रें नाना ॥
देई तिजसह दुसऱ्या वेश्या तरुणि रूपसंपन्ना ॥ ५५ ॥
परिवारासह निघे तेथुनी चतुरा वृद्धा वेश्या ॥
स्वीयबुद्धिनें सिद्ध कराया विकट राजसंदेशा ॥ ५६ ॥
आश्रम केला नौकेवरती सकलभोग समृद्ध ॥
फलपुष्पांचे रम्यवृक्ष ते पाहुनि जनमन लुब्ध ॥ ५७ ॥
नौकामार्गे नदीप्रवाहें अंगदेश सोडून ॥
वेश्या निघती विभांडकाश्रम दूर असा पाहून ॥ ५८ ॥
नदीतटाकीं नौकाश्रम तो स्थापुनि करिती वास ॥
चारद्वारां शोध आणवी वृद्धा प्रतिसमयास ॥ ५९ ॥

---

१ दुसऱ्यास फसविण्यांत फार कुशल. २ स्त्रियांनीं. ३ विश्वास दाखवून. ४ ऐकून. ५ हे राजा, क्षमा कर. ६ आपल्या मंडळी सहित. ७ आपल्या स्वकीय चातुर्यानें. ८ नदीतीरीं. ९ हेरांकडून.

मुनीविभांडक आश्रम सोडुनि जाय कधीं बाहेर ॥
वसे आश्रमीं कपणेकाळीं, नित्य सांगती हेर ॥१०॥
वृद्धेनें निजकन्या वेश्या साधाया नृपकार्या ॥
कर्त्तव्यानें बोधियली बहु मोहाया ऋषिवर्या ॥ ११ ॥
करिगमनेतें[1] सिद्ध करी त्या हरिच्या[2] दरींतें[3] जाया ॥
शृंगऋषीचें चित्त हराया, नृपचिंता वाराया ॥ १२ ॥

---

नसे आश्रमीं मुनीविभांडक ऐसा पाहुनि संधी ॥
वेश्या येउनि शृंगऋषीतें कुशलप्रश्नें बोधी ॥ १३ ॥
सुंदर वेश्या पाहुनि वाटे प्रथम त्यास आश्चर्य ॥
अर्घ्यपाद्यें पूजूं धावे, मानुनि तिज ऋषिवर्य ॥१४॥
वेश्या बोले, "कुशल असासिकीं तापस तूं मुनिशृंगा ? ॥
फलमूलांची येथ समृद्धी ? अध्ययना[4] अव्यंगा[5] ॥१५ ॥
साधिशिकीं तूं गुरुप्रसादें ? गुरुविभांडक कुशली ? ॥
पूज्य पिता तव,उग्रतपस्वी,त्याची मूर्ति न दिसली?१६
तापस तुह्मी, तप तुमचें बहु वृद्धीतें कीं पावे ? ॥
विजनें[6] आश्रमीं रमशी कीं तूं, मानस नित्य सुखावें? १७
हे मुनिवर्या, तवदर्शन मी इच्छुनि येथें आलों. ॥
बहुपुण्यानें दर्शन मजला घडलें चित्तीं धालों[7]" ॥ १८ ॥

---

शृंगी बोले, "यावें ब्रह्मन्, वंद्य मला तूं असशी ॥
निज ऐश्वर्यें नक्षत्रापरि तेजस्वी बहु दिसशी ॥ १९ ॥

---

१ गजगामिनीला. २ सिंहाच्या. ३ गुहेंत. ४,५ तुझें वेदाध्ययन निर्विघ्नपणें चाललें आहेना. ? ६ एकांत, निर्मनुष्य. ७ समाधान पावलों अथवा तृप्त झालों.

हें दर्भासन, बैस यावरी, पाद्यातें स्वीकारीं ॥
हें अर्घ्य तुला, भक्षाया हीं फलमूलें रुचिकारी ॥ ७० ॥
हें कृष्णाजिन[1] रम्य सुखासन, यावरि त्वां बैसावें ॥
आश्रम कोठें, नाम काय, हें स्पष्ट मला सांगावें ॥७१॥
देवापरि मज दिससी ब्रह्मन्, कोण व्रत आचरशी ? ॥
वेश्या सांगे, "तीनयोजनें येथुनि पर्वत देशीं ॥ ७२ ॥
माझा आश्रम मी तुज वंदीं, वंदन मजला न करीं ॥
व्रतस्थमी कीं, ह्मणूनि पाद्या अर्घ्या न स्वीकारीं ॥७३॥
उत्थापन[2] ही नलगे मजला, म्यां तुज आलिंगावें" ॥
ऐसें सांगुनि आलिंगी त्या, ऋश्यशृंग सुखपावे ॥७४ ॥
देई तीतें पक्क[3] फळें बहु भल्लातक[4] आमॅलकें ॥
हिंगणबेटें गोड पिप्पलें औदुंबर पिण्याकें ॥ ७५ ॥
वेश्येनें तीं वर्जुनि त्यातें भक्ष्यें खाद्यें नाना ॥
परोपरीचीं चारुनियां मग करवितसे मधुपाना[6] ॥ ७६ ॥
तीं भक्ष्यें तो फळेंचि मानी, रसनेला अतिगोड ॥
लागति त्याच्या, वेश्या मानी 'पुरलें माझें कोड'॥७७॥
सुगंध पुष्पें द्रव्येंहि तशीं वसनें चित्र विचित्रें ॥
अभुक्त[7] पूर्वीं, भोगुनि होतीं तृप्त मुनीचीं गात्रें ॥ ७८ ॥
शृंगी पावुनि अत्यानंदा हांसे नाचे खेळे ॥
कंदुक खेळत तीही त्याच्या आंगावरतीं लोळे ॥७९॥
लज्जित होई स्त्री धर्माचे हावभाव बहु दावी ॥

१ हरिणाचें कातडें. २ उठून उभे राहणें. ३ वनांतील पिकलेली फलमुळें खाऊन ते पितापुत्र संतुष्ट असत, त्याच फळांपैकीं. ४ बिब्याचीं फळें. ५ आवळे. ६ मद्यपान. ७ पूर्वी कधींही न खालेली.

वारंवारहि आलिंगी दृढ चित्तीं स्मरशर[1] खोंवी ॥ ८० ॥
युवतीदर्शन भ्रांत करी जरि विमल[2] चित्त जें शांत ॥
दृढालिंगनें[3] कां न घडावें शृंगीचें मग विकृत[4]? ॥ ८१ ॥
वेश्या नंतर निजप्रयाणा[5] चिंतुनियां यत्नानें ॥ ॥
काश्यप मुनि तो आश्रमिं येइल सहसा ह्या शंकेनें[6][7] ॥ ८२ ॥
'साधाया निज अग्निहोत्र तें' ऐशा आदेशानें[8] ॥
निघोनि गेली शृंगऋषीतें करुनी मत्त मदानें ॥ ८३ ॥

---

मुहूर्त मात्रें काश्यपगोत्री, नाम विभांडक ज्याला ॥
सर्वशरीरीं दीर्घ केश ज्या, सांबापरि जो भोळा ॥ ८४ ॥
हर्यक्षापरि[9] जटाजूट तो पिंगट उग्र विशाळ ॥
वृत्ति-तप-स्वाध्याय-समाधि-स्थैर्य जयाचें विमळ[10] ॥ ८५ ॥
आश्रमिं येई, पुत्रा पाहे, भ्रांतापरि जो बसला ॥
श्वासा सोडी, दीनापरि बहु विपरीतचि तो दिसला ॥ ८६
वेश्या गेली, तद्विरहानें[11] शून्य जयाला सारें ॥
पुत्र स्नेहें तात पुसे त्या शृंगऋषीतें, बारे ॥ ८७ ॥
ऊर्ध्वा[12] दृष्टी करुनि पाहशीं, ध्यान कशाचें करिशी? ॥
गृहकार्यातें लक्ष्य न देशीं, दीन असा कां असशी? ॥ ८८
वत्सा सोडुनि होम धेनुतें नाहीं दोहन[13] केलें? ॥

---

१ आपल्या शरीराच्या स्पर्शानें त्याच्या अंतःकरणांत मदनाचे बाणच टोचते कीं काय. २ शुद्ध. ३ गाढ आलिंगनानें. ४ कामविकारानें युक्त. ५ आतां आपण येथून निसटून जावें हें मनांत आणून. ६,७ विभांडक ऋषि अकस्मात येईल ह्या भीतीनें. ८ निमित्तानें—मिषानें. ९ सिंहासारखी. १० पवित्र. ११ तिच्या विरहानें. १२ वरती डोळे करून. १३ धार काढिली.

स्रुचा[1], स्रुवा[2], हीं पात्रें सारीं, मार्जन त्यांचें झालें? ८९
अग्निहोत्र तें उपासिलें कीं? सायंतन[3] होमाच्या ॥
समिधा कोठें? तेवि न दिसती त्या ज्योतिष्टोमाच्या[4] ९०
अति चिंतापर आज असा कां दिसशी वत्सा, बारे ॥
सांग मला तूं, कोणी परकी आलें होतें कां रे?" ॥९१

---

बोले मग तो "ताता, येथें कोणी एक तपस्वी ॥
ब्रह्मचर्यधर आला होता सुंदररूप मनस्वी ॥ ९२ ॥
र्‍हस्व[5] नव्हे जो दीर्घ हि नोहे, नीलजटाधर माथां ॥
सूर्यापरि तो अतितेजस्वी मजला गमला[6] ताता ॥ ९३ ॥
कमलपत्रसम[7] नेत्रें त्याचीं कृष्णवर्ग[8] आकर्ण[9] ॥
सुवर्ण सुंदर पिवळा तैसा गौर तनूचा वर्ण ॥ ९४ ॥
नीलवर्ण त्या जटा तयाच्या द्वैधीकृत[10] सुकुमार ॥
सुवर्णरज्जू[11], मणिगण त्यांवरि गुंफियले साचार ॥ ९५ ॥
वक्त्र[12] तयाचें बहु सुंदर तें हर्षवि अंतःकरणा ॥
त्यांतुनि निघती शब्द मनोहर, सुख देती मम कर्णा ९६
वसंतमासीं वायू वाहे सीतल मंद सुगंध ॥
फार मनोहर त्याहुनि[13] त्याच्या दिव्य तनूचा गंध ॥९७॥
माझ्या कंठीं रुद्राक्षाची जैसी माला आहे ॥
तैसी त्याच्या कंठीं हस्तीं स्वर्ण मण्यांची पाहे ॥९८॥

---

१,२ अग्निहोत्र्यास लागणाऱ्या पात्रांचीं नावें आहेत. ३ संध्याकाळच्या. ४ याग. ५ फार ठेंगणा नसून फार उंचही नाहीं ६ वाटला, दिसला. ७ कमलाच्या पानासारखीं. ८ (काजळानें) काळीभोर. ९ कर्णापर्यंत. १० दुभागे. ११ सोन्याचे अलंकार विशेष. १२ मुख. १३ श्रेष्ठ.

बा-का-१५



कंठाखालीं उरस्थळीं त्या दोन पीनें मृदु पिंड ॥
त्यांच्या स्पर्शे मजला झालें ताता सौख्य उदंड ।९९॥
रोमें तयावरि आले नसती, पिंड मनोहर दिसती ॥
सिंहापरि कृश कटी तयांची स्वर्णमेखळा वरतीं १००
जैशी माझी मुंज मेखला तैसी त्यांची स्वर्ण ॥
चक्रवाकसम भूषणभूषित सुंदर त्यांचे कर्ण ॥१०१॥
तपस्वियाच्या चरणीं हस्तीं शब्द होतसे साचा ॥
हलतां फिरतां, जैसा उदकीं मत्त अशा हंसांचा १०२
अद्भुत शब्द कशाचा नकळे, वस्त्रें त्यांचीं दिव्य ॥
तैशीं माझीं हीं ना दिसती रूपवंत ना भव्य ॥१०३॥
त्या वस्त्रांच्या अंतर्भागीं स्वर्णमेखला एक ॥
दिसली ताता, काय तिची ती अद्भुत वाणूं चमक १०४
उजव्या हस्तीं एक तयांच्या फल होतें वाटोळें ॥
चित्रफला त्या भूमीवरतीं आपटुनी तो खेळे ॥१०५॥
पुनःपुन्हा तें उडुनी त्याच्या हस्तीं येउनि बैसे ॥
पुन्हा तयातें ताडन करि तो, नगमे फळ तें कैसें १०६
वक्षावरतीं वक्ष ठेउनी मज तो दृढ आलिंगी ॥
जटा धरोनीं, तेणें झालों तद्विषयीं अनुरागी ॥१०७॥
दिव्यतपस्वी उदाररूपी, पुत्रचि कीं देवाचा ? ॥
त्याचा महिमा ताता तुजला काय कथूं मी वाचा ॥१०८॥

---

१ स्थूल, मोठाले. २ केश. ३ सोन्याचा कंबरपट्टा. ४ गवताची मेखळा ब्रम्हचाऱ्याच्या कमरेस बांधितात ती. ५ सोन्याची. ६ चेंडू. ७,८ त्याजविषयीं माझ्या मनांत प्रीति उत्पन्न झाली.

ध्यादिलें म्यां अर्घ्यदिलें, परितो तें ने घे कांहीं ॥
परिरंभाविण नलगे त्यातें, तुष्ट निरिच्छ सदाही १०९।
हिंगणबेटें वन्यफळें बहु दिधलीं त्यारुचिकारी ॥
''व्रतस्थ आहे, नलगे मजला'' ह्मणुनी न स्वीकारी ११०
दिधलीं मजला फळें तयानें दर्शनीयें बहु गोड ॥
वन्य फळांपरि त्यांनां ऐशा साली नव्हत्या जाड १११
वन्य फलांचा तयाफलांशीं कोण असा हा भेद ॥
मिष्टमला बहु त्या फळांचा रस-सार त्वक् स्वाद ११२
प्राशविलें मज तेणें रुचिकर सुरस सुवासिक जल तें ॥
तेणें मी अति हर्षित झालों, वाटे भूमी हलते ॥११३॥
सुगंधपुष्पें हीं बघ ताता, तद्वस्त्रांतुनि ग ळीं ॥
टाकुनि येथें मूर्ति तयाची स्वीयें आश्रमा गेली ।११४।
पुंस्कोकिलवद्वाणी त्याची मधुरा, ऐकुनि चित्त ॥
माझें झालें तद्विरहानें व्यग्र, उदास, व्यथित ॥११५॥
ब्रह्मचारि तो गेल्यापासुनि दाहा शरिरीं वाटे ॥
वाटे मानसिं तापस येउनि मज तो केव्हां भेटे ।११६।
वाटे, आतां असेल तेथें जाउनि त्या भेटावें ॥
त्याचा आश्रम पाहुनि त्याशीं बोलावें विहरावें ।११७।
धन्य तयाचें ब्रह्मचर्यतें, काय तपस्या त्याची ॥
त्यास न बघतां चैनपडेना, आस बहुत भेटीची ।११८॥
काम विलास विहीन तपस्वी, विपर्यो जो अज्ञान ॥

१ आलिंगनावांचून. २ दिसण्यांत सुंदर. ३ वरीलसाल ४ गोडी, रुचि. ५ स्वकीय. ६ पुरुषजातीच्या कोकिलाप्रमाणें ७ हिंडावें फिरावें. ८ आशा. ९ मदनाच्या चेष्टा त्यास मुळीं माहित नाहींत असा.

असा विभांडक मुनी वदे मग शृंगीचें ऐकून ॥११९॥

---

"अद्भुतरूपें[1] चित्रविचित्रें, अतिरमणीयें एक ॥
उग्रें स्थूळें[2] अतिसूक्ष्में किती, बीभत्सें कित्येक ॥१२०॥
धारण करुनी अशीं स्वरूपें राक्षस भूवरी फिरती ॥
विविधें उपायें[3] विप्रव्रत तें भंग कराया टपती ॥ १२१
मुनी तापसी वनीं राहती शुद्ध तपा आचरती ॥
त्यांच्या इच्छितलोका हेरुनी[4] मानसिं राक्षस रमती १२२
विप्रतपांचा भंग कराया पाप्याचा संचार ॥
दाविति रूपें लुब्ध[5] कराया अति सुंदर सुकुमार १२३
त्या पाप्यांचें नलगे दर्शन त्यांशीं स्नेह नको तो ॥
ज्यांच्या संगें अंतराय[6] कीं तप- अध्ययना होतो ॥ १२४
स्रक्[7] चंदन हे भोग मुनीला न शोभती बा तुच्छ ॥
पापरूप जें मद्य, जळो तें, प्राशन करिती नीच ॥१२५
भोगरूप बहु अंतराय हे यत्नानें टाळावे ॥
दुर्जनसंगा वर्ज्य करावें, स्वतपा सांभाळावें ॥ १२६
विप्रकाय[8] हा क्षुद्रां भोगांसाठीं नगणी पुत्रा ॥
तीव्र तपानें काया झिजवी, भोगी सौख्य अमुत्रा[9] १२७

---

१ राक्षस नानाप्रकारचीं रूपेंधारण करून तपस्व्यास भुलवितात. २ मोठालीं. ३ नानाप्रकारच्या उपायांनीं. ४ हरण करून. ५ लोभ उत्पन्न करण्यासाठीं. ६ विघ्न. ७ सुवासिक चंदन पुष्पें व त्यांच्या माला. ८ "ब्राह्मणस्य देहोऽयंक्षुद्रान्कामायनेष्यते ॥ कृच्छ्रायतपसेचेहप्रेत्यानंतसुखायच" ॥ १॥ हा श्लोक श्रीमद्भागवतांतील असून प्रसंगास्तव समश्लोकरूपानें येथें घेतला आहे. ९ मरणानंतर, परलोकीं

ऐशा वचनीं विभांडकानें निजपुत्रा बोधियलें ॥
राक्षस आला असेल जाणुनि सारें वन शोधियलें ॥१२८
तीन दिवस तो शोधी परि त्या राक्षस नाहीं दिसला
काश्यप भोळा परते सदना, राक्षस कोठें कसला! १२९
पुन्हां एकदां मुनी विभांडक जाई अन्यवनातें ॥
श्रावणें[1] विधिपूर्वक वर्षाच्या फलमूल ग्रहणातें ॥१३०
ऐशी उत्तम संधी पाहुनि वेश्याकन्या येई ॥
शृंगऋषीतें भेटे, प्रेमें आलिंगन त्या देई ॥ १३१ ॥
वेश्यादर्शनमात्रें झाला अति हर्षित तो शृंगी ॥
उडी घालुनी भेटे प्रेमें, गाढ तिला आलिंगी ॥ १३२
विसरे सारे बोल पित्याचे विप्रहितप्रद[2] साचे ॥
बोले तिजला:-"दावी मजला स्थान तुझ्या वासाचें १३३
जाऊं जोंवरि आला नाहीं काश्यप, माझा तात ॥
वेश्या मानी धन्य आपणा, 'जिंकियली कीं मात १३४
शृंगऋषीतें नेई तेथुनि वेश्या ती वेगानें ॥
आश्रमरूपीं नौकेमध्यें घाली अनुरागानें ॥ १३५ ॥
शुभ्रा नौका, कृत्रिमें[3] विपिनश्रीनें दिसली भव्या ॥
नानायत्नें लालन करुनी पाळिति[4] त्या ऋषिवर्या १३६

---

१ अमुक नक्षत्रावर फलें आणावीं, अमुक पौर्णिमेस धान्य, अमुक दिवशीं दर्भ, असे ऋषींचे नियम आहेत, त्यांप्रमाणें. २ ब्राम्हणांस हितकारक असे पित्याचे बोल, उपदेशपर भाषण. ३ नौकेवर झाडें लाऊन वनाची शोभा आणिली होती त्या शोभेनें. ४ ठेऊन घेती; वेश्या हा कर्ता.

नौबंधन[1] मग सोडुनि वेगें चालविली ती नाव ॥
आणियलीं कीं निज प्रदेशा ! ज्यासि 'अंग हें' नांव १३७
नदीप्रवाहें चंपा नगरी सन्निध ती[2] नेऊन ॥
"नाव्याश्रम" हें वनप्रदेशा नाम तया ठेवून ॥१३८॥
वृद्धावेश्या वृत्त सविस्तर सांगे मग राजाला ॥
शृंगऋषीतें आणायाचें होतें संकट ज्याला ॥ १३९ ॥
चंपापुरपति लोमपाद ही झाला अति संतुष्ट ॥
त्या ऋषिपुत्रा वेगें करवी स्वांतःपुरीं[3] प्रविष्ट ॥ १४० ॥
तों इकडे त्या अंगपतीला इंद्रें दर्शन दिधलें ॥
तया प्रसादें वर्षण झालें, जग हें जलमय दिसलें १४१
पूर्णकाम[4] तो झाला नरपति ऋश्यशृंग आल्यानें ॥
त्यातें देई शांता कन्या आनंदें बहुमानें ॥ १४२ ॥
युक्ती योजी शांत कराया विभांडकाच्या कोपा ॥
मार्गीं धाडी चतुरामात्यां[5] सेवक पशुगण[6] गोपां[7] ॥१४३॥
फलमूलांचा करून संग्रह मुनी आश्रमीं आला ॥
आश्रमांत सुत नाहीं पाहुनि तो पावे कोपाला ॥१४४
पुत्रा शोधी, न दिसे कोठें, तेणें क्रोध दुणावे ॥
चिंती स्वांतीं, हें कोणाचें कुत्सित[8] कर्म असावें ॥१४५

---

१ नाव नांगरून स्थिर उभी होती, तो नांगर मुकाट्यानें वरतीं उचलून घेऊन नाव चालू केली. २ नौका. ३ आपल्या अंतःपुरांत पाठविला. ४ ज्याचे मनोरथ परिपूर्ण झाले असा. ५ चतुर प्रधानास. ६ गाई, म्हशी वगैरे. ७ गोपाळ, गवळी. ८ मी आश्रमीं नसतां माझ्या पुत्रास नेणें हें निंद्यकर्म.

अंगपतीनें शृंगी नेला, ऐसी शंका येई ॥
चंपानगरी दग्ध कराया झाली मग त्या घाई ॥१४६॥
पुरराष्ट्रासह अंगपतीतें दग्ध कराया निघत ॥
जातां मार्गीं सायंकाळीं झाला क्षुधित श्रांत ॥ १४७ ॥
गोपाळांनीं निर्मित ऐसा घोष[1] तया आढळला ॥
त्यां करवीं सत्कार[2] पावतां हर्षे पुसता झाला ॥ १४८
"कोण तुह्मी, हे कोणाचे पशु, कोण स्वामी तुमचा"॥
हस्त जोडुनी गोप बोलती सविनय मधुरा वाचाः—१४९
"सकल देश हा सर्वहि वैभव आहे शृंगऋषींचें ॥
भूमि गोधनें अश्व वीरहे, सेवक आह्मी त्याचे ॥१५०
कृपा असावी दासांवरि ह्या, सेवेतें सांगावें ॥
इच्छित सर्वहि देतों अह्मी, स्वामीनीं मागावें" ॥१५१
ऐशा रीतीं सत्कारानें नम्रा मधुरा वचनीं ॥
काश्यप मार्गीं जातां पावे पूजा स्थानीं स्थानीं ॥१५२
चंपानगरा येई तोंवरि सांडी अत्यामर्ष[3] ॥
अंगपतीनें पूजा करितां तेणें पावे हर्ष ॥ १५३ ॥
ऐश्वर्यानें युक्त अशा मग पाहे निज पुत्रातें ॥
नृपकन्या ती शांता सुंदरि झाली भार्या ज्यातें ॥१५४
पुत्राचें हें वैभव पाहुनि पावे मुनि तो हर्ष ॥
त्यांत सुनेनें वंदन करितां विसरे कोप अशेष[4] ॥१५५॥

---

१ रानांत मार्गावर ठेविलला गौळ वाडा. २ आदर आतिथ्य. ३ फार क्रोध आला होता तो. ४ सर्व.

प्रसन्न झाला मुनी विभांडक, लोमपाद राजाला ॥
आशिर्वचना देउनि कथिता शृंगऋषीतें झाला ॥१५६
"राजा इच्छी तोंवरि येथें पत्नीसह तूं राहीं ॥
राजाचें प्रिय होय तोंवरि तव विरहा मी साही १५७
ग्रामवास हा वर्ज्य मुनीला, परि नरपतिचा हेतू ॥
आहे तोंवरि येथें राहे, स्वस्थाना मग ये तूं" ॥ १५८
प्रिय पुत्रातें ठेउनि तेथें काश्यप विपिना[१] गेला ॥
स्नुषादर्शनें बहुमानानें क्रोध जयाचा नेला[२] ॥ १५९ ॥
ताताज्ञेपरि अंगपतीला तोषवुनी तो शृंगी ॥
पितृचरणांचें दर्शन घ्याया झालासे अनुरागी ॥१६०॥
ऋश्यशृंग मग वनासि निघतां त्याची सुंदर कांता ॥
कांतासह कांतारीं जाया सिद्ध होय ती शांता ॥१६१
शांता कन्या अंगपतीची, शृंगी तो वनवासी ॥
परि भक्तीनें अनुरागानें सेवी नित्य तयासी ॥ १६२ ॥
वसिष्ठ मुनिला अरुंधती, कीं जेवि नला दमयंती ॥
मुद्गलमुनि तें जैसी वश्या, तैसी सेवी त्या ती ॥ १६३
अगस्त्य मुनितें लोपामुद्रा, जेवि रोहिणी चंद्रा ॥
वज्रधरातें इंद्राणी परि शांता त्या विप्रेंद्रा ॥ १६४ ॥
भार्यापति[३] ते साधुनि गृह्या वानप्रस्थ विधीतें ॥
उग्रतपानें देहा-अंतीं पावति परमगतीतें ॥ १६५ ॥
त्यांचा जो अतिपवित्र आश्रम पांडव तो पाहूनी ॥
समाधान बहु मानिति ऐसें चरित्र वरि ऐकूनी ॥१६६

१ अरण्याप्रत. २ दूर केला. ३ गृहस्थाश्रमी पुरुष.

हें शृंगीचें चरित्र सुंदर लोमश धर्मा सांगे ॥
मुदित होउनी पांडव निघती गंगासागरमार्गे ॥१६७॥
वनपर्वाच्या एकशतोत्तर दशमापासुनि तेरा ॥
चतुराध्यायीं चित्र चरित्रा चतुर श्रोते हेरा ॥ १६८ ॥
त्र्यंबक शर्मा मधुर भाषणीं श्रोत्यां क्षणेक तर्पी ॥
पुण्यग्रामीं अल्पकाव्य हें भगवच्चरणीं अर्पी ॥ १६९ ॥

समाप्त.

# वाचनमंदिर.

अथवा

‘ कटाक्ष ’ पत्रांतल्या

## सुंदर चटकदार लेखांतले.

निवडक निबंध.

हें पुस्तक वाचून ठेवण्यासारखें आहे.

किं ०५ ट. ह. ०॥

—∞:*:*:*:∞—

# करमणूक.

अथवा

‘ कटाक्ष ’ पत्रांतले मौजेचे

## सुरस चुटके !

फारच गोड व मार्मिक आहेत.

किं ०७ ट. ह. ०॥

अनंत वामन बर्वे—पेठ शनवार, घर नं. ४३९, पुणें.

# चित्रपाट.

## WOODCUTS-&-STEREO PLATES.



छापतां येण्यासाठीं नानाप्रकारचीं चित्रें, नक्षीचीं अक्षरें, व्यापाराच्या खुणा (Trade marks.) हुबेहुब सह्या (Facsimile of signatures) नांवाच्या संक्षिप्तमुद्रा (Monograms) वगैरे आमच्याकडे विलायती लांकडावर कोरून, अथवा शिशाचीं पक्कीं ओतून मिळतील. शिवाय रबरी शिक्के हि आमच्या मार्फत मिळतील.



पुणें, पेठ शनवार घर नं० ४३९

# जाहिरात.

| | | रु. | आ. |
|---|---|---|---|
| १ | अरेबियननाइट भाग १ तें ९ .... .... | ९ | ० |
| | फुटकळ प्र० .... .... .... | १ | ८ |
| २ | रासेलसचे मराठी भाषांतर .... .... | ० | ९ |
| ३ | गोविंद तारक गीत ( वैराग्य-भक्ति, ज्ञानपर पदें ) .... .... | ० | ६ |
| ४ | गीतगोविंद [ जयदेवकविकृत.] .... | ० | ६ |
| ५ | रायगड किल्ल्याचें वर्णन. .... .... | ० | ८ |
| ६ | ऐतिहासिक गोष्टी भाग १ ला .... | ० | २ ६ |
| ७ | ” ” भाग २ रा .... | ० | ३ |
| ८ | बायकांची गाणीं भाग १ ते ४ .... | १ | |
| | फुटकळ घेणारास .... .... .... | ० | ६ |
| ९ | लेखरत्नमाला [नानाफडणवीस व महादजी शिंदे यांचा पत्रव्यवहार ].. .... | ० | ६ |
| १० | नारायराव आणि गोदावरी. .... | १ | ४ |
| ११ | सुभाषित [ निबंध मालेंतील ]. .... | १ | ४ |
| १२ | इतिहासावरील निबंध .... .... | ० | ८ |
| १३ | ग्रांटडफचे बखरीवरील टीका. .... | ० | ९ |
| १४ | केकावली. .... .... .... | ० | ३ |
| १५ | कै. विश्वनाथ नारायण मंडालिक यांची तसबीर. | | ४ |

पत्ता—म्यानेजर चित्रशाळा छापखाना, पुणें.